# माणसाला माणूस बनविण्याचे काम करते ती भाषा : डॉ. एस. एम. मणेर

कोल्हापूर : साहित्यातून व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होत असतो. भाषेमुळेच व्यक्तीचे व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटतो. म्हणून भाषेचा वापर विचार करून करावा. भाषा माणसाचे मस्तक जागृत ठेवण्याचे काम करते. हिंदी भाषेचे साहित्य अशाच प्रकारचे आहे. हिंदी भाषा ही माणसाला माणूस बनविण्याचे काम करते, असे मत तुळजाभवानी महाविद्यालय, तुळजापूरचे प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी व्यक्त केले.

ते विवेकानंद कॉलेजच्या हिंदी विभागाच्यावतीने आयोजित हिंदी सप्ताह समारोप समारंभाप्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार हे होते.

प्राचार्य डॉ. मणेर पुढे म्हणाले की, भाषा ही एक असे माध्यम आहे की ज्यामुळे मनुष्य आपले विचार, आपली भावना दुसऱ्यांसमोर व्यक्त करू शकतो. शब्दांची जखम ही तलवारीच्या जखमेपेक्षा खोल असते. जसे रस्ता पार करताना आपण आजुबाजूला बघून पुढे जाणे म्हणजेच अपघात होणार नाही याची काळजी घेणे अगदी तसेच भाषेचा वापर करताना दुसऱ्याला त्याचा त्रास होणार नाही ना? याची काळजी आपणच घ्यायला हवी.

अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार म्हणाले की, विद्यार्थ्यांनी भाषेचा बारकाईने अभ्यास केला पाहिजे कारण भाषेमुळेच अनेकांचे नातेसंबंध जोडले जातात आणि तुटतातसुद्धा. त्यामुळे नेहमी भाषेचा प्रयोग करताना विचार करूनच केला पाहिजे. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख ही त्याच्या भाषेतूनच होत असते.

हिंदी सप्ताहामध्ये निबंध स्पर्धा, स्वरचित काव्य वाचन स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा, समीक्षा लेखन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आदि स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिंदी विभागप्रमुख डॉ. अनिल मकर यांनी केले. आभार हिंदी विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. दीपक तुपे यांनी मानले. सूत्रसंचालन ऋतुजा कांबळे व साक्षी माळी यांनी केले. यावेळी प्रा. मनोज खोले, प्रा. रवि कुमार व हिंदी विद्यार्थी - विद्यार्थिनी उपस्थित होते.